राष्ट्रीय कृषी विकास योजनेखालील राष्ट्रीय पुरक प्रथिने अभियानांतर्गत दूधगंगा सहकारी संघ, इंदापूर, जि.-पुणे यांना बळकटीकरण, विस्तारीकरण व आधुनिकीकरणासाठी मंजूर प्रकल्पाच्या वाढीव घटकांसाठी मंजूर निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांकः एमएलके-२०१४/प्र.क्र.२७५/पदुम-१० (भाग-१)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: २० एप्रिल, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय क्र. राकृवि २०१३/प्र.क्र. ७६/पदुम-८, दि. ८/०८/२०१३
२) शासन निर्णय क्र. राकृवि २०१३/प्र.क्र. ७६/पदुम-८, दि. २९/१०/२०१३
३) शासन निर्णय क्र. राकृवि २०१३/प्र.क्र. ७६/पदुम-८, दि. ३/१२/२०१३
४) शासन निर्णय क्र. राकृवि २०१३/प्र.क्र. ७६/पदुम-८, दि. १२/१२/२०१५
५) सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांचे सं.क्र. आदुवि-५/सी-१/दुधगंगा दुध संघ/अवसायन अंतिम आदेश/२०१६/१६०५, दि. २४/०८/२०१६ चे आदेश
६) मा. मंत्री (पदुम) यांचे अपील क्र. ९/२०१६ वरील सुनावणीचे आदेश, दि. १२/०५/२०१७
७) आयुक्त दुग्धव्यवसाय विकास, मुंबई यांचे सं. क्र. आदुवि-६/RKVY/NMPS/इंदापूर दुधगंगा /न. क्र. १४/२०१७-१८/२५०, दि. १०/१०/२०१७ रोजीचे पत्र
८) सहनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) यांचे सं.क्र. आदुवि-५/सी-१/इंदापूर दुधगंगा/निधी/ २०१८/९७, दि. २३/०३/२०१८ रोजीचे पत्र

प्रस्तावना :-

दुधगंगा सहकारी दुध उत्पादक संघ, इंदापूर, जि.-पुणे या संघास राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत राष्ट्रीय पुरक प्रथिने निर्माण अभियान या घटकाखाली सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या २ वर्षाकरिता रु. ६१७.०२/- लक्ष (शासन हिस्सा रू. ४६२.७६ लक्ष व संघ हिस्सा रू. १५४.२६ लक्ष) रकमेचा एक लक्ष लिटर्स प्रतिदिन क्षमतेचा प्रक्रिया संयंत्र प्रकल्प शासन निर्णय दि. ८/०८/२०१३ अन्वये मंजूर करण्यात आला होता. प्रकल्प मंजूरीनंतर उपरोक्त निधीपैकी रू. १५५.१० लक्ष दि. २९/१०/२०१३ रोजी, रु. ९०.८० लक्ष दि. ०३/१२/२०१३ रोजी, व रू. २१६.८६ लक्ष दि.१२/०२/२०१५ रोजीच्या शासन

निर्णयान्वये ३ टप्प्यात दुधगंगा सहकारी दुध उत्पादक संघ, इंदापूर, जि.-पुणे यांना मंजूर करण्यात आले होते.

मात्र सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) महाराष्ट्र राज्य यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे १०२ (१)(क) (४) नुसार दुधगंगा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, इंदापूर, जि.-पुणे हा संघ अवसायनात काढत असल्याबाबतचे आदेश दि. २४/०८/२०१६ रोजी निर्गमित केल्याने सदर आदेशाविरोधात या संघाने मा. मंत्री (पदुम) यांच्याकडे दि. ६/९/२०१६ रोजी अपील क्र. ९/२०१६ अन्वये अर्ज दाखल केला. सदर अपील अर्जावर दि. १२/०५/२०१७ रोजी अंतिम आदेश देण्यात आले असून काही अटी/शर्तींच्या अधिन राहून सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांचे दि. २४/०८/२०१६ रोजीचे आदेश खारीज करण्यात आले. दरम्यानच्या कालावधीत दूधगंगा सहकारी दुध उत्पादक संघास RKVY अंतर्गत मंजूर रू. ४६२.७६ लक्ष निधीपैकी आयुक्त दुग्धव्यवसाय यांचे खाती जमा असलेला रू. १६७.३४ लक्ष इतका शिल्लक निधी रोखून धरण्यात आला होता. मात्र या प्रकरणी मा. मंत्री (पदुम) यांचे दि. १२/०५/२०१७ रोजीचे आदेश आणि आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांनी त्यांचे दि. १०/१०/२०१७ रोजीचे पत्रान्वये दिलेला अहवाल, तसेच सहनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) यांनी त्यांचे दि. २३/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने दूधगंगा सहकारी दुध उत्पादक संघ इंदापूर, जि.-पुणे यांना RKVY अंतर्गत मंजूर रू. ४६२.७६ लक्ष निधीपैकी आयुक्त दुग्धव्यवसाय यांचे खाती जमा असलेला परंतू रोखून धरण्यात आलेला निधी सदर संघास वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

दुधगंगा सहकारी दुध उत्पादक संघ, इंदापूर, जि.-पुणे यांना RKVY अंतर्गत मंजूर रू. ४६२.७६ लक्ष निधीपैकी आयुक्त दुग्धव्यवसाय यांचे खाती रू. १६७.३४ लक्ष इतका निधी शिल्लक आहे. मा. मंत्री (पदुम) यांचेकडील उपरोक्त नमूद अपील क्र. ०९/२०१६ मध्ये दि. १२/०५/२०१७ रोजी झालेल्या आदेशातील अटी शर्तींचे अनुपालन संघ पुढील २ महिन्यात करेल याचे अधीन राहून शिल्लक रकमेपैकी रू. १ कोटी इतका निधी या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत आहे. दुधगंगा सहकारी दुध उत्पादक संघ, इंदापूर, जि.-पुणे यांनी दि. १२/०५/२०१७ चे आदेशातील अटी व शर्तींचे अनुपालन केले आहे किंवा कसे याचा आढ़ावा घेतल्यानंतरच उर्वरीत निधी वितरीत करण्याबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०४२०११५७२३५५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok Tanbaji Uike

Digitally signed by Ashok Tanbaji Uike
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87cfab3c12a61b33987277f837a341fb6c84ebe6d1bf10339d150649af95e5b8, cn=Ashok Tanbaji Uike
Date: 2018.04.20 11:57:34 +05'30'

(अशोक उईके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री (पदुम), महाराष्ट्र राज्य
४. आयुक्त दुग्धव्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई
५. सहनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) वरळी मुंबई.
६. प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे
७. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), पुणे
८. जिल्हा विशेष लेखापरिक्षक (दुग्ध), पुणे
९. निवड नस्ती, पदुम-१०.